श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)

**Website:** https://mfulecollegewarud.org/    Ph. No. 07229-232022

## अहवाल

## फिट इंडिया यंग इंडिया

राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे दि. १५ ऑगस्ट ते २ ऑक्टोम्बर २०२० या कालावधीमध्ये फिट इंडिया यंग इंडिया अभियान राबविण्यात आले. या मध्ये रा.से.यो. स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन दररोज योगासने करून, धावून सहभाग घेतला तसेच परिसरातील लोकांमध्ये या अभियानाचे महत्व पटवून देत त्यांना पण सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. या अभियानामध्ये एकूण ७३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी यांनीसुद्धा सहभाग घेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचे काम केले.






मातृभूमि

FACEBOOK.AMRAVATIDAINIKMATRUBHUMI

### महात्मा फुले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे

## यंग फिट इंडिया सिरीज अभियान

**ता.प्रतिनिधी । ६ ऑक्टोबर**

**वरुड** - श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित स्थानिक महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे कोरोना पासुन वाचण्यासाठी तसेच आपले आरोग्य सुदृढ राहावे.

यासाठी सर्व उपाय योजना अवलंबुन यंग इंडिया फिट इंडिया फ्रिडम सिरीज हे अभियान राबविण्यात आली. हे अभियान राबवत असतांना वरिष्ठ महाविद्यालयातील विविध विद्यार्थ्यांनी आपल्या घरी राहुन विविध योगासने केली तसेच काही विद्यार्थ्यांनी नियमित रनिंग सुद्धा केली व समाजातील लोकांना स्वत:ची शरीरयष्टी चांगली राहावी यासाठी प्रवृत्त केले. या अभियानामध्ये प्रतिक्षा यादव, रश्मी बारस्कर, देवेश देवघरे, अश्विनी ढोके, पल्लवी अंबुलकर, प्रगती बोंडरकर, ज्ञानेश्वरी रेवतकर, मुकेश युवनाते, पल्लवी केने, तुही सोसकर, भावना चोपडे, अनिकेत गजभिये, गौरी भुते, निकिता गाडबैल, कृतिका चिंचमलातपुरे, रितु मनोहरे, श्रेयश वानखडे, नेहा चौधरी, पायल झाडे, अंकिता कपिले, निशांत यावले, कुणाल चांदुरकर, पुनम थोर, साक्षी रेवतकर, पुजा धांडे, साक्षी ठाकरे, प्रतिक्षा दुपारे, चंचल वंजारी आदी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ.अतुल वंजारी व सहकार्यक्रम अधिकारी डॉ.रिना बकाले यांनी सुद्धा उत्स्फुर्तपणे स्वत: सहभाग घेतला.

या यंग इंडिया फिट इंडिया फ्रिडम सिरीज अभियानाच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा.डॉ.अतुल वंजारी, डॉ.उमेंद्र सांगुळकर, सह कार्यक्रम अधिकारी डॉ.रिना बकाले व डॉ.प्रियंका बेलसरे यांनी परिश्रम घेतले तर या संपुर्ण अभियानाला महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डी.वडते यांनी मार्गदर्शन केले.

**Online Media Link:** https://portal.suryodaylive.com/17821/

Principal
Mahatma Fule Arts, Comm.& Sitaramji Chaudhari Science Mahavidyalaya, Warud

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## आरोग्य तपासणी शिबीर

करोना चा वाढता प्रादुर्भाव पाहता राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे दि. २१ सप्टेंबर २०२० ते २४ सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरिता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तामधील ऑक्सिजन च्या प्रमाणाचे महत्व लक्षात घेता या शिबिरामध्ये रक्तामधील ऑक्सिजन चे प्रमाण व शरीराचे तापमान मोजण्यात आले. सदर शिबिरामध्ये महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दररोज नियमितपणे आपले आरोग्य तपासून घेतले. सदर शिबिराचा लाभ एकूण ६३ कर्मचाऱ्यांनी घेतला व सगळ्यांचे आरोग्य उत्तम आढळून आले.






Principal
Mahatma Fule Arts, Comm.& Sitaramji Chaudhari Science Mahavidyalaya,Warud

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## हॅन्ड ग्लोव्स व मास्क वाटप

१५ ऑगस्ट २०२० चे अवचित्त साधून राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे महाविद्यालयातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांना मोफत हॅन्ड ग्लोव्स व मास्क चे वाटप करण्यात आले. महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया सुरु असतांना विद्यार्थी विविध ठिकाणावरून प्रवेशाकरिता महाविद्यालयामध्ये येतात तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांना प्रवेश प्रक्रिये दरम्यान विविध कागदपत्रे हाताळावे लागतात त्यामुळे करोना चा संसर्ग होण्याचं प्रमाण वाढू शकते. हि बाब लक्षात घेता राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे १५ ऑगस्ट २०२० चे अवचित्त साधून कार्यालयीन कर्मचाऱ्यांना मोफत हॅन्ड ग्लोव्स व मास्क चे वाटप करण्यात आले. १७ कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी याचा लाभ घेतला.







Principal
Mahatma Fule Arts, Comm.& Sitaramji
Chaudhari Science Mahavidyalaya,Warud

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## रा.से.यो. स्थापना दिवस साजरा

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे २४ सप्टेंबर २०२० रोजी ५१ वा राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाचे अवचित्त्य साधून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वंजारी यांनी करोना महामारीचा प्रकोप बघता लोकांची आरोग्य तपासणी करण्याचा निर्णय घेतला व त्यासाठी शेंदुर्जना घाट या गावातील ९० लोकांची आरोग्य तपासणी स्वतः करून घेतली. तपासणी करतांना शरीराचे तापमान, रक्तामधील ऑक्सिजन चे प्रमाण, रक्तदाब इत्यादी चाचण्या करून घेतल्या. तसेच या महामारीच्या काळात फ्रंट लाईन वर्कर्स म्हणजेच आपले पोलीस बांधव आणि त्यांची सुद्धा प्रकृती चांगली राहावी या साठी शेंदुर्जना घाट नगरीतील पोलीस स्टेशन मधील ठाणेदार गेडाम साहेब सहित अन्य स्टाफ ची पण आरोग्य तपासणी करण्यात आली. सदर आरोग्य तपासणी मध्ये सगळ्यांची प्रकृती स्थिर जाणवली.



मातृभूमि

आरोग्य तपासणी करून साजरा केला राष्ट्रीय सेवा योजना दिन

महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी महाविद्यालयाची संकल्पना

ता.प्रतिनिधी। २६ सप्टेंबर

वरुड - श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित स्थानिक महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ५१ वा राष्ट्रीय सेवा योजना दिन नुकताच करण्यात आला. यानिमित्ताने नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली.

सद्य:ची कोविड-१९ ची वाढती परिस्थिती लक्षात घेता जनतेची आरोग्य तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये रक्तामधील ऑक्सिजनचे प्रमाण, पल्स रेट, शरीराचे तापमान अशा पॅरामीटरची चाचणी करण्याचे ठरविण्यात आले तसेच आरोग्य तपासणी सर्वेक्षणासाठी शेंदुरजनाघाट या गावाची निवड करण्यात आली. सर्वेक्षण पार पाडण्याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ.अतुल वंजारी यांनी शेंदुर्जनाघाट मधील जवळपास ९० लोकांची आरोग्य तपासणी केली त्यामध्ये लहान मुलांपासून ते वृद्ध व्यक्ती पर्यंतची तपासणी करण्यात आली. तसेच या कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावापासून जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी पोलिसांचा सुध्दा मोलाचा वाटा असतो म्हणून जनतेसाठी रात्र दिवस झटणाऱ्या पोलिसांची सुध्दा आरोग्य तपासणी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. अतुल वंजारी यांच्याकडून करण्यात आली.

शेंदुरजनाघाट येथील पोलीस स्टेशनचे ठाणेदार एस.एम.गेडाम यांच्याकडून महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डी.वडते तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ.अतुल वंजारी याचे अभिनंदन केले. आरोग्य तपासणी केलेल्या जवळपास ९० नागरिकांचे आरोग्य हे साधारण दिसून आले.



प्रतिदिन अखबार

स्वास्थ्य जांच से मना राष्ट्रीय सेवा दिन

वरुड़- श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित व संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय द्वारा संचालित स्थानीय महात्मा फुले कला, वाणिज्य व सिताराम चौधरी विज्ञान महाविद्यालय का राष्ट्रीय सेवा योजना विभाग की ओर से 51वां राष्ट्रीय सेवा योजना दिन स्वास्थ्य जांच कर मनाया. 90 नागरिकों ने अपने स्वास्थ्य की जांच कराई. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वंजारी, थानेदार एस.एम. गेडाम, प्राचार्य डॉ. जे.डी. वडते उपस्थित थे.

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022










Principal
Mahatma Fule Arts, Comm.& Sitaramji
Chaudhari Science Mahavidyalaya,Warud



श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## पर्यावरण पूरक दिवाळी

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे १४ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२० या कालावधीमध्ये पर्यावरण पूरक दिवाळीचे आयोजन करण्यात आले होते. त्या मध्ये महाविद्यालयातील विविध विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पर्यावरण पूरक दिवाळी साजरी केली व तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वंजारी यांनी फटाक्यांमुळे पर्यावर्णावर होणारे दुष्परिणाम व तसेच आपल्या शरीरावर होणारे दुष्परिणाम याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हाट्सअँप च्या माध्यमातून करून दिली. या पर्यावरण पूरक दिवाळीचे अवचित्त साधून विद्यार्थ्यांनी अगदी साध्यापणे दिवाळी साजरी केली त्यामध्ये हातानी घरी बनवलेला आकाश दिवा, विविध प्रकारच्या रांगोळ्या व रोज एक दिवा शाहीदांसाठी या सगळ्यांचा समावेश होता..

**Online Media Link:** https://portal.suryodaylive.com/22290/



पाने १२, अमरावती
किंमत ४.०० रु.
•अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, पाच स्वतंत्र आवृत्या•
संपादक- अनिल अग्रवाल
आरएनआय क्र : MAHMAR/2010/35500 Postal No.ATI/RNP/291/17-19
बुधवार, दि. १८ नोव्हेंबर २०२०

# मातृभूमि

संस्थापक- स्व.व्रजलाल बियाणी
90 वर्ष जुनं ते सोनं
घरी रहा सुरक्षित रहा
गरज पडेल तेव्हा शिवसेना हिंदुत्वाची तलवार घेऊन हजर राहील
FACEBOOK.AMRAVATIDAINIKMATRUBHUMI

## महात्मा फुले महाविद्यालयातील इको फ्रेन्डली दिवाळी साजरी

▪ राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

**ता.प्रतिनिधी। १७ नोव्हेंबर**

**वरुड** - स्थानिक महात्मा फुले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे इको फ्रेन्डली दिवाळी साजरी करण्यात आली.

यावर्षी महाराष्ट्र सरकारतर्फे निवासी भागात फटाके विकण्यावर बंदी घालण्यात आली होती तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वायू व ध्वनि प्रदूषणामुळे शरीरावर होणारे विपरीत परिणाम सोशल मीडियाद्वारे महाराष्ट्रातील जनतेला अवगत करुन दिले. याचीच दखल घेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित वरुड येथील महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे यावर्षी पर्यावरणपूरक इको फ्रेन्डली दिवाळी साजरी करण्याचे ठरविण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व तसेच रसायनशास्त्र विभागाचे सहाय्यक प्रा.डॉ.अतुल वंजारी यांनी दिवाळीच्या फटाक्यांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते व त्यामुळे विषारी घटक हवेत मिसळतात नंतर त्याचा परिणाम शरीरावर जाणवू लागतो तसेच श्वसनाचे वेगवेगळे विकार व आजारांविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी इको फ्रेन्डली दिवाळी साजरी करतांना घरेलु वस्तूपासून बनविलेले आकाशदिवे, रचनाकृत रांगोळी काढुन व तसेच देशाच्या सिमेवर शाहिद झालेल्या आपल्या जवानांसाठी श्रद्धांजली म्हणून एक दिवा शहिदांसाठी लावुन ही दिवाळी इको फ्रेन्डली दिवाळी म्हणून साजरी करावी असे विद्यार्थ्यांना कळविण्यात आले व विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. या इको फ्रेन्डली दिवाळी संकल्पनेमध्ये रेवती शंकरपाळे, शिबानी डहाके, जया भुयार, भाविक डुहीजोड, प्रणाली मोदक, वैशाली सालफळे, पायल मांगलकर, रितू मनोहरे, रोहिणी सावळे, नेहा काळभोर, अंकिता निस्वादे, सेजल थेरे, अर्चना रेवतकर, तृप्ती नेहारे, निकिता गाडबैल, वैष्णवी घोरमाडे, पूनम थोर, अश्विनी जोगेकर, पूजा लाडे, हर्षाली काळमेघ, विशाखा रेवतकर, दिक्षा धोटे, धनश्री रेवतकर, रुजेल पाटील, अर्पिता पाटील, माहेश्वरी पांडव, श्रद्धा तडस, वेदांत पांडे, दिनेश शेकापुरे इत्यादी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

इको फ्रेन्डली दिवाळीनिमित्य आज खरी गरज आहे ती पर्यावरण संवर्धनाची तसेच प्रदूषण वाढविणाऱ्या प्रत्येक गोष्टींवर आळा घालण्याची आणि आज असे करणे मानवहिताचे ठरणार आहे असा संदेश महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डी.वडते यांच्याकडून विद्यार्थ्यांना देण्यात आला. या इको फ्रेन्डली दिवाळी संकल्पनेच्या यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.अतुल वंजारी, प्रा.डॉ.उमेंद्र सांगुळकर, सह-कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.रीना बकाले व प्रा.डॉ.प्रियंका बेलसरे यांनी परिश्रम घेतले तर या संपुर्ण संकल्पनेला महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे. डि.वडते यांनी मार्गदर्शन केले.

Principal
Mahatma Fule Arts, Comm.& Sitaramji Chaudhari Science Mahavidyalaya, Warud

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/    Ph. No. 07229-232022

## अहवाल

## रक्तदान शिबिर

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे रविवार २० डिसेम्बर २०२० रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उदघाटक म्हणून वरुड पोलीस स्टेशन चे ठाणेदार आय.पी.एस श्रेणिक लोढा तर अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.डी. वडते हे होते. रक्तदान शिबिराची प्रस्तावना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वंजारी यांनी केली व आपल्या प्रस्तावनेतून रक्तदान केल्यानंतर आपल्या शरीरावर होणारे फायदे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. रक्तदान शिबिराचे उदघाटक आय.पी.एस श्रेणिक लोढा हे स्वतः एम.बि.बि.एस असल्यामुळे त्यांनी रक्तदानाचे फायदे विद्यार्थ्यांना अतिशय चांगल्या पद्धतीने समजावून सांगितले व तसेच करियर बद्दल मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे.डी. वडते यांनी रक्तदान करणे हे आपले कर्तव्य आहे असे आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना पटवून दिले. या रक्तदान शिबिरामध्ये एकूण ५२ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

**News Link:** https://youtu.be/pvWSB2OSKn8

**मातृभूमि** — FACEBOOK.AMRAVATIDAINIKMATRUBHUMI — शुक्रवार, दि. २५ डिसेंबर २०२०

महात्मा फुले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनच्या

### रक्तदान शिबिराचे श्रेणिक लोढा यांचे हस्ते उद्घाटन



ता.प्रतिनिधी। २४ डिसेंबर

वरुड - स्थानिक महात्मा फुले महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने ठाणेदार श्रेणिक लोढा यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

श्री.शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संलग्नित वरुड येथील महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे नुकतेच रक्तदान शिबीर घेण्यात आले. कोरोना महामारीचे संकट पाहता दिवसेंदिवस महाराष्ट्रातील तसेच देशातील रक्तसाठा कमी होत आला त्यामुळे देशात फक्त ७ ते ८ दिवसांपुरताच रक्तसाठा असल्याचे दिसून आले. ऐरवी महाराष्ट्र देशात रक्त संकलनात अग्रेसर आहे मात्र आता कोरोनामुळे रक्तटंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्या अनुषंगाने हा रक्तसाठा कसा लवकरात लवकर वाढवता येईल यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.राजेश बुरंगे यांनी अथक परिश्रम घेत विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या सगळ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या युनिटला रक्तदान शिबीर आयोजन करण्याचे आवाहन केले होते. त्याचीच दखल घेत वरुड येथील महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे नुकतेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन वरुड पोलिस स्टेशनचे नवनियुक्त आयपीएस ठाणेदार श्रेणिक लोढा यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्व पटवून दिले तसेच विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव करुन दिली. आयपीएस ठाणेदार श्रेणिक लोढा यांनी वरुड नगरीत पोलीस स्टेशनमार्फत होत असलेल्या विविध उपक्रमाचा लेखाजोखा विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थी दशेतील वय हे करियर घडविण्यासाठी झटवा, असे प्रतिपादन श्रेणिक लोढा यांनी आपल्या उदघाटणीय भाषणातून विद्यार्थ्यांना दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.अतुल वंजारी यांनी रक्तदान स्नेहानुबंध अभियानाचे महत्व पटवून देतांना रक्तदान केल्यानंतर आपल्या शरीरावर होणारे फायदे विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच आपल्या देशातील एकुण जनसंख्येपैकी २ टक्के लोकांनी जर रक्तदान केले तर आपल्या देशात कधीच रक्ताचा तुडवडा भासणार नाही असे डॉ.अतुल वंजारी यांनी आपल्या प्रास्ताविकेतुन सांगितले. या रक्तदान शिबिरामध्ये युवकांनी हिरीरीने सहभाग दाखवत ५२ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. याप्रसंगी प्रा.किरण पवार, प्रा.राजेश झोटिंग, प्रा.डॉ.गिरीधर रेड्डी, प्रा.डॉ.सुगंध खंगार, प्रा.डॉ.आम्रपाली पाटील, प्रा.डॉ.प्रियंका बेलसरे, ग्रंथपाल घोरपडे, प्रा.डॉ.नलिनी बोडखे व तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान हे श्रेष्ठदान या स्नेहानुबंध अभियानामध्ये सहभागी झाले.

### महाविद्यालय के विद्यार्थियों को समझाया रक्तदान का महत्व



संवाददाता | वरुड.

महात्मा फुले महाविद्यालय के राष्ट्रीय सेवा योजना की ओर से रक्तदान शिविर का आयोजन हालही में किया गया। कोरोना महामारी के संकट को देखते हुए रक्तदान शिविर का आयोजन किया गया।

शिविर का उद्घाटन थानेदार श्रेणिक लोढा ने करते हुए विद्यार्थियों को रक्तदान का महत्व बताया तथा विद्यार्थियों को राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राष्ट्रीय जिम्मेदारी का अहसास कराया। विद्यापीठ के रासेयो संचालक डा. राजेश बुरंगे ने रक्तदान शिविर आयोजन करने का आह्वान किया था। इस आह्वान को प्रतिसाद देते हुए वरुड के महात्मा फुले कला, वाणिज्य व सीताराम चौधरी विज्ञान महाविद्यालय के रासेयो द्वारा रक्तदान शिविर आयोजित किया गया। इस समय कार्यक्रम अधिकारी डा. अतुल वंजारी ने रक्तदान स्नेहानुबंध अभियान का महत्व बताया। शिविर में 52 विद्यार्थियों ने रक्तदान किया। इस समय प्रा. किरण पवार, प्रा. राजेश झोटिंग, प्रा. डा. गिरीधर रेड्डी, प्रा. डा. सुगंध खंगार, प्रा. डा. आम्रपाली पाटील, प्रा. डा. प्रियंका बेलसरे, ग्रंथपाल घोरपडे, प्रा. डा. नलिनी बोडखे ने शिविर में सहभागी होकर रक्तदान किया।

दैनिक भास्कर — Thu, 24 December 2020 — https://epaper.bhaskarhindi.com/c/57254850

श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती



# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**
**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## माझी वसुंधरा हरित शपथ

राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे माझी वसुंधरा अभियान अंतर्गत नवीन वर्षात पदार्पण करताच दि. ०६/०१/२०२१ बुधवार रोजी हरित शपथ घेण्यात आली. महाराष्ट्र शासनाने नववर्षात माझी वसुंधरा अभियान हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविणे हाती घेतलेले आहे त्या निमित्याने वसुंधरेच्या प्रति आपली जबाबदारी म्हणून हि शपथ घेण्यात आली. निसर्गाशी संबंधित पृथ्वी, जल, वायू, अग्नी, आकाश या पंचतत्वावर आधारित असणारी वसुंधरा तिचे रक्षण तिच्या प्रति आपली जबाबदारी आहे. त्याची जाण विद्यार्थी, पालक व समाजाला झाली पाहिजे त्यासाठी हा उपक्रम शासनातर्फे राबविल्या जात असल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. वडते यांनी केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. वडते, राष्ट्रिय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वंजारी, प्रा. डॉ. उमेंद्र सांगोळकर, प्रा. डॉ. रीना बकाले, रासेयो सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रियंका बेलसरे, वरुड पोलीस स्टेशनचे ठाणेदार आय.पी.एस श्रेणिक लोढा, तहसीलदार किशोर गावंडे, नायब तहसीलदार प्रतिभाताई चौधरी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी भारी संख्येनी उपस्थित राहून शपथ घेतली. हरित शपथेचे वाचन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. वडते यांनी केले.







**Principal**
Maharna Fule Arts, Comm.& Sitaramji Chaudhari Science Mahavidyalaya,Warud



श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## रस्ता सुरक्षा सप्ताह

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे २२ जानेवारी २०२० रोजी रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करताना प्रादेशिक परिवहन निरीक्षक दौड मॅडम यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणेतून विद्यार्थ्यांना रस्त्यावरून दुचाकी, चारचाकी व तसेच पैदल कसे चालावे यांची नियमावली समजावून सांगितली व तसेच आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निवारण केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. डी. वडते यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधतांना सांगितले कि जर आपल्याला डोकं आहे तर आपण हेल्मेट घातलेच पाहिजे. प्रस्तावनेतून रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अतुल वंजारी यांनी रस्ता सुरक्षा अभियानाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. या रस्ता सुरक्षा सप्ताह मध्ये एकूण ९९ रासेयो स्वयंसेवकांनी आपला सहभाग नोंदविला.









Principal
Maharma Fule Arts, Comm.& Sitaramji Chaudhari Science Mahavidyalaya,Warud



श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती

**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## आंतरराष्ट्रीय योग दिवस

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे दि २१ जून २०२० रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. कारोना चा वाढत प्रादुर्भाव पाहता विद्यार्थ्यांनी घरीच राहून योग्य दिवस साजरा केला व आपल्या शेजाऱ्यांना सुद्धा योग्य करण्यास प्रोत्साहित केले. तसेच काही विद्यार्थ्यांनी योग्य दिवस साजरा करण्याबाबत जनजागृती सुद्धा केली. मत्स्यासन, नौकासन, भुजंगासन, धनुरासन, पद्मासन, शवासन इत्यादी प्रकारची विविध आसने विद्यार्थ्यांनी व तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिवीक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आप आपल्या घरी राहून केली.







Principal
Mahatma Fule Arts, Comm.& Sitaramji
Chaudhari Science Mahavidyalaya, Warud



श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती


**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022

## अहवाल

## शिक्षक दिन

महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रिय सेवा योजनेतर्फे दि 5 सप्टेंबर २०२० रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. आपल्या भारतात दरवर्षी 5 सप्टेंबर रोजी शिक्षक दिन आयोजित केला जातो. आमच्या भारतातील दुसरे डॉ सर्वपल्ली हा देखील राधाकृष्णन यांचा वाढदिवस आहे आणि ते स्वत: शिक्षक होते आणि शिक्षणास समर्पित होते, म्हणून हा स्मृतिदिन म्हणून हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. तरी या वर्षी शिक्षक दिन साजरा करतांना संपूर्ण जगाला कारोना या विषाणूमुळे जवळीक साधने कठीण झाले आहे, त्यामुळे यावर्षीचा शिक्षक दिन हा रासेयो स्वयंसेवकांसोबत गुगल मीट द्वारे साजरा करण्यात आला. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आप आपल्या आवडत्या शिक्षकांविषयी भाष्य केले व तसेच शिक्षणातील शिक्षकांचे महत्व पटवून दिले.




Principal
Maharna Fule Arts, Comm.& Sitaramji Chaudhari Science Mahavidyalaya, Warud



श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती

# महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जिल्हा-अमरावती


**NAAC Reaccredited with 'B' Grade CGPA (2.43)**

**Website:** https://mfulecollegewarud.org/ Ph. No. 07229-232022


## अहवाल

## कारोना वायरस जनजागृती अभियान

कारोना वायरस या घातक विषाणूपासून स्वतःला कसे सावध ठेवावे यासाठी जनजागृती म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे कारोना वायरस जनजागृती पोस्टर बनवून ऑनलाईन माध्यमाचा वापर करून पोस्टर प्रसारित करण्यात आले. सदर पोस्टर हे व्हाट्सअँप, टेलिग्राम इत्यादी प्रकारच्या सोशल मीडियाचा वापर करून विविध स्तरातील लोकांपर्यंत पोहचविण्यात आले. पोस्टरद्वारे चित्रित केल्यानुसार दोन व्यक्तींमधील अंतर ६ फूट ठेवावे, नियमितपणे हात साबणाने स्वच्छ धुवावे, सॅनिटायझर चा वापर नियमित करत राहावा, तब्बेत बारी नसल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा अशे संदेश देण्यात आले.




Principal
Mahatma Fule Arts, Comm.& Sitaramji Chaudhari Science Mahavidyalaya, Warud